# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६०

फॅक्स : ०२०–२५६९१२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.

संदर्भ : प.प्रवेश/ ४२३४ दिनांक : ९/८/२०१२

प्रति,
**मा. विभागप्रमुख/मा. प्राचार्य,**
सर्व शैक्षणिक विभाग/संलग्नित सर्व महाविद्यालये.

**विषय** : आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याबाबतचे नियम व अटी.

महोदय/महोदया,

आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत अर्थसहाय्य देण्याची योजना सन २००७ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. या अर्थसहाय्य योजनेचे नवीन नियम व अटी तयार करण्यात आल्या असून सदरचे नियम व अटी शैक्षणिक वर्ष २०१२–१३ पासून अस्तित्वात येत आहेत. सदरचे नियम व अटी सोबत जोडल्या आहेत.

सन २०१२–१३ पासून आर्थिक दुर्बल घटकातील अर्थसहाय्यासाठी करण्यात येणारे अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येणार असून यासंदर्भात सविस्तर परिपत्रक नंतर जाहीर करण्यात येईल. सोबत जोडलेले नियम व अटी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन त्याप्रमाणे सर्व संबंधितांनी कार्यवाही करावयाची आहे.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव,
पदव्युत्तर प्रवेश विभाग

# आर्थिक दुर्बल घटक अर्थसहाय्य योजना

## नियम व अटी

आर्थिक दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक गरजू विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून पुणे विद्यापीठाने अर्थसहाय्य देण्याची योजना सन २००७ पासून कार्यान्वित केलेली आहे.

**अ) आवश्यक पात्रता**

१. विद्यार्थ्याच्या पालकांचे (कुटूंबातील सर्व सदस्यांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त नसावे. यासाठी संबंधित तहसिलदाराचा दाखला आवश्यक राहील.

२. विद्यार्थ्याने मागील लगतच्या परीक्षेत किमान ६५ टक्के गुण संपादित केलेले असावेत.

३. विद्यार्थी भारतीय नागरिक असावा. त्यासाठी नागरिकत्वाचा साक्षांकित दाखला जोडणे आवश्यक राहील.

४. महाविद्यालय/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये विद्यार्थ्याने नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असावा.

५. विद्यार्थ्याची नियमित अभ्यासक्रमात किमान ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक राहील. या संदर्भात प्राचार्यांनी दाखला देणे आवश्यक राहील.

६. विद्यार्थी अन्य कोणतीही शिष्यवृत्ती किंवा शुल्कामध्ये सवलत घेणारा नसावा.

७. व्यावसायिक अभ्याक्रमासाठी विद्यार्थ्याची नोंदणी नसावी.

८. विद्यार्थ्यास गैरशिस्त/नैतिकता/परीक्षेतील गैरप्रकार इ. बाबत शिक्षा झालेली नसावी.

९. विद्यार्थ्याने त्याच्या बँक खात्याची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. उदा. बँकेचे नाव, पत्ता, खाते क्रमांक (एमआयसीआर कोड आणि आयएफएस कोड).

१०. संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य हे विद्यापीठाचे मान्यताप्राप्त असावेत.

११. विद्यापीठ शैक्षणिक विभाग/महाविद्यालय यांनी त्यांच्या स्तरावर अर्जांची छाननी करुन पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे जास्तीत जास्त दहा आणि पदवी अभ्यासक्रमाचे जास्तीत जास्त वीस विद्यार्थ्यांची शिफारस करता येईल.

१२. विद्यार्थ्याने आणि संबंधित प्राचार्यांनी एकत्रित हमीपत्र भरून देणे आवश्यक राहील.

१३. सदरचे अर्थसहाय्य पात्र विद्यार्थ्यास संपूर्ण अभ्यासक्रमात एकदाच देण्यात येईल.

१४. पात्र विद्यार्थ्यास पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रु. ६,०००/- व पदवी अभ्यासक्रमासाठी रु. ३,०००/- असे आर्थिक सहाय्य देण्यात येईल.

**ब) अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

१. वार्षिक उत्पन्नाचा तहसिलदाराने दिलेला दाखला.

२. विद्यार्थ्याच्या मागील लगतच्या अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत.

३. नागरिकत्वाच्या दाखल्याची साक्षांकित प्रत.

४. विद्यार्थी आणि प्राचार्यांचे एकत्रित हमीपत्र.

५. प्राचार्यांच्या मान्यतेबाबत विद्यापीठाच्या पत्राची प्रत.

६. विद्यार्थ्याची उपस्थिती ७५ टक्के पेक्षा जास्त असल्याबाबत मा. प्राचार्यांचे प्रमाणपत्र.